**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१**

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स ०२०/२६१११५३

क्रमांक- युएनआय/२०२०/हेल्पलाईन/विशि-१ 4133 दिनांक- 11 मे, २०२०

प्रति,

मा.कुलगुरु,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.महाराष्ट्र राज्य.

**विषय कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकासंदर्भात विद्यार्थ्यांना येणा-या अडचणीसाठी हेल्पलाईन नंबर उपलब्ध करणेबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निर्देशानुसार विद्यापीठांच्या परीक्षा घेण्याबाबत तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांचे शैक्षणिक कॅलेंडर व परीक्षांकरिता एक सामाईक योजना तयार करण्याकरिता राज्यातील चार विद्यापीठांचे कुलगुरु तसेच संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण यांची एक राज्यस्तरीय समिती दिनांक ०६ एप्रिल, २०२० रोजीच्या आदेशान्वये गठीत करण्यात आली. सदर समितीने आपला अहवाल शासनास दिनांक ६ मे, २०२० रोजी सादर केला आहे. सदरचा अहवाल शासनाने स्वीकृत केलेला आहे. तसे शासनाने शासन पत्र दिनांक ८ मे, २०२० च्या पत्रान्वये कळविलेले आहे..

या अहवालातील शिफारसीनुसार प्रत्येक विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात येणा-या अडचणीबाबत हेल्पलाईन उपलब्ध करुन द्यावी अशी शिफारस केलेली होती. त्यानुसार सर्व विद्यापीठातील हेल्पलाईनची यादी जोडलेली आहे. तरी सदरची माहिती आपल्या विद्यापीठाच्या तसेच विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांनी कार्यालयाच्या वेबसाईटवर तात्काळ प्रसिध्द करावी व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**प्रत- माहितीस्तव सादर-**

१. स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. स्वीय सहाय्यक, मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३३
३. मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२